# राजकीय अर्थकारण

## महाराष्ट्रातील निवडणूकीय राजकारणातील मैलाचा दगड

संपादक

डॉ. प्रकाश पवार

डायमंड पब्लिकेशन्स

राजकीय अर्थकारण
संपादक : डॉ. प्रकाश पवार

Rajkiya Arthakaran
Edited by Dr. Prakash Pawar

पहिली आवृत्ती : ऑक्टोबर, २०१७

ISBN 978-93-86401-25-0

© डायमंड पब्लिकेशन्स, २०१७

मुखपृष्ठ
शाम भालेकर

अक्षरजुळणी
डायमंड पब्लिकेशन्स

मुद्रक
स्टार कॉपिअर्स प्रा. लि. पुणे

प्रकाशक
डायमंड पब्लिकेशन्स
२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट
ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०
☎ ०२०-२४४५२३८७, २४४६६६४२
info@diamondbookspune.com

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी भेट द्या
www.diamondbookspune.com

प्रमुख वितरक
डायमंड बुक डेपो
६६१ नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक
पुणे-४११ ०३० ☎ ०२०-२४४८०६७७

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी-फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

## मनोगत

हा ग्रंथ वाचकांपुढे सादर करताना आम्हा
विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील 'राजकीय प्रक्रि
या ग्रंथाची सुरुवात झाली. महाराष्ट्राच्या राजकारणाच
राष्ट्रीय राजकीय प्रक्रिया यांच्या सहसंबंधातून एकविस
झाली आहे. केंद्रात भाजपचे सरकार स्थापन झाले. त
राजकीय प्रक्रियेवर झाला. राष्ट्रीय पातळीवरून महाराष्ट्रा
राजकारणाची जुळवाजुळवी केली गेली. ही प्रक्रिया
गतीने घडली आहे. त्या प्रक्रियेसंबंधी संशोधन राज्यश
कोल्हापूर करत आला आहे. लोकसभा निवडणूक २०
आले. राष्ट्र आणि राज्य पातळीच्यानंतर स्थानिक पात
झाले. हे झालेले बदल समजून घेण्यासाठी 'महाराष्ट्राच
असा प्रकल्प सुरू केला. ६, ७ व ८ डिसेंबर २०१६ रोजी
निवडणूक २०१६ या विषयावर दोन दिवसांचे चर्चास
डिसेंबर, २०१६). स्थानिक राजकारण अर्थकारणामु
डॉ. अरुणा पेंडसे, मुंबई विद्यापीठ, यांच्याबरोबर डिसें
आली. तसेच डॉ. उषा ठक्कर यांनी 'महिलांचा राजक
सविस्तर चर्चा केली. त्यावर आधारित महिला सर
सहभागाबद्दल सखोल चर्चा करण्यात आली (लोकमत
तालुक्यातील चौदा आजी-माजी महिला सरपंच यांनी र
प्रत्यक्ष अनुभवांचे कथन केले. तसेच नगराध्यक्षा स्वात
डॉ. नीता माने (जयसिंगपूर) यांचे राजकीय अनुभव क
पाटील, मेधा पानसरे यांनी महिलांच्या सहभागावर सर
आयुक्त श्री. जगेश्वर एस. सहारिया यांनी निवडणुक
केली. त्यांनी प्रशासकीय पातळीवरती मदत केली. र
एक चौकट तयार झाली. हे चौकट निर्मितीचे काम र
सर्वांचे मनःपूर्वक आभार!

राज्यशास्त्र म्हणजे काय? हा एक कूटप्रश्न आहे
आणि खासगी क्षेत्रांचा समावेश राजकीय म्हणून के

२०. पनवेल, मालेगाव, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका — २८३-२८९
- दत्ता जाधव

२१. छोट्या शहरातील महिलांची राजकीय भागीदारी — २९०-२९९
- डॉ. वैशाली पवार

२२. शहरी राजकारण आणि पक्षीय सत्ता स्पर्धा — ३००-३१९
- डॉ. वैशाली पवार

• संदर्भसूची — ३२०-३२५

• लेखक-परिचय — ३२६-३२७

## विभाग १

# राजकीय अर्थका
# नवहिंदुत्व जा

२१

# छोट्या शहरातील महिलांची राजकीय भागीदारी

डॉ. वैशाली पवार

लोकशाही व्यवस्थेमध्ये महिला व पुरुष हे दोन घटक समान असतात; परंतु, प्रत्यक्ष समाज व्यवहारात महिला हा घटक दुर्बल, मागास राहिलेला दिसतो. महिला या घटकाचा विकास करण्यासाठी शासकीय पातळीवर महिला सबलीकरणाचे धोरण, प्रक्रिया राबविली गेली. राजकीय क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी सकारात्मक कृतीचे धोरण आखले गेले. महिलांचे राजकीय सबलीकरण याचा अर्थ महिलांना राजकीय सत्ता, अधिकार पदे, समान राजकीय अधिकार, समान राजकीय संधी प्रदान करणे होय. निर्णय-निश्चितीचा अधिकार देणे, उत्पादनाच्या साधनांवर महिलांची मालकी व नियंत्रण प्रस्थापित करणे होय. ७३ व ७४व्या घटनादुरुस्तीने महिलांना स्थानिक शासन संस्थांमध्ये ३३ टक्के जागा राखीव ठेवल्या गेल्या; समकालीन दशकात ५० टक्के जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. या राखीव जागांमुळे संपूर्ण महाराष्ट्रात स्थानिक शासन स्वराज्य संस्थांच्या पातळीवर १,१९,८५१ एवढ्या महिला निवडून आलेल्या आहेत. ही स्थानिक पातळीवरील महिलांच्या राजकीय सबलीकरणाची प्रक्रिया आहे. शासनाने आखलेले महिला सबलीकरण धोरण, राज्य महिला आयोग व महिला आर्थिक विकास महामंडळ या सर्व उपायांच्या द्वारे महिलांच्या सबलीकरणाची प्रक्रिया कार्यान्वित होत आहे. स्थानिक पातळीवर महिला सबलीकरण प्रक्रियेला यश मिळताना दिसत आहे; परंतु, राज्य व राष्ट्रीय पातळीवर महिलांना राजकीय क्षेत्रात आरक्षण नसल्याने महिलांच्या राजकीय समावेशनाची प्रक्रिया घडून येताना दिसत नाही. राज्य व राष्ट्रीय पातळीवर महिलांचे राजकीय सबलीकरण घडून येण्यासाठी सकारात्मक कृती धोरणाची गरज आहे.

सबलीकरण किंवा सक्षमीकरण ही अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये महिलांना विचार व कृती करण्यासाठी सक्षम केले जाते. महिलांमध्ये स्वतंत्रपणे काम करण्याची तसेच ज्ञान, अनुभव व सत्ता प्राप्त करण्याची क्षमता यामधून विकसित केली जाते. मानवी, शारीरिक, आर्थिक व वैचारिक अशा संसाधनांवर सबलीकरणातून नियंत्रण ठेवता येते. सबलीकरण ही केवळ बाह्य नियंत्रण असल्याची भावना नसून ती स्त्रियांची अंगभूत क्षमता वाढविते. तिचा आत्मविश्वास वाढविण्याबरोबरच पारंपरिक विचार-

प्रणालीमध्येदेखील बदल घडवून आणला जातो. एकूणच समाजाचा सर्वांगीण विकास करण्याकरिता महिला सबलीकरण संकल्पना महत्त्वाची ठरते.

**महिला सबलीकरण संकल्पनेचा अर्थ**

'युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट फंड फॉर वुमेन' यांनी महिला सबलीकरण संकल्पनेचा सांगितलेला अर्थ खालीलप्रमाणे-

१) ज्यामुळे संबंधांमध्ये बदल होतो ते लिंगभावविषयक संबंध समजून घेणे व ज्ञान प्राप्त करणे.

२) 'स्व'ची भावना किंवा स्वाभिमानाची जाणीव विकसित करणे. तसेच स्त्रीला स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून देणे आणि स्वतःच्या जीवनावर तिचे स्वतःचे नियंत्रण प्रस्थापित करणे.

३) सत्ताप्राप्तीसाठी लागणाऱ्या सौदेबाजीच्या क्षमतांचा विकास करणे.

४) सामाजिक बदलाची दिशा ठरविणे व त्यावर प्रभाव टाकण्याची क्षमता विकसित करणे. सबलीकरण ही मनाची एक अवस्था किंवा भावना आहे, जिचा संबंध प्रत्यक्ष सामाजिक प्रभावाशी, राजकीय सत्तेशी व कायदेशीर हक्कांशी येतो. व्यक्ती, संघटना व समाज यांचे बहु पातळ्यांवर संबंध प्रस्थापित करणारी ही संकल्पना आहे. याशिवाय महिलांना सत्ता, अधिकार देणे, त्यांच्यामध्ये क्षमता व कौशल्ये विकसित करणे. महिलांना कायद्याच्या चौकटीमध्ये कायदेशीर अधिकार देणे किंवा अधिकृतपणे सत्ता देणे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सुप्त क्षमता प्रत्यक्ष वापरता येतील असे सामाजिक व आर्थिक वातावरण कायद्याने तयार करणे. महिलांमध्ये कर्तेपणाची क्षमता विकसित करणे तसेच माणूस म्हणून जगण्याची क्षमता विकसित करणे, हे महिला सबलीकरण संकल्पनेचे विविध अर्थ आहेत.

'महिलांचे राजकीय सबलीकरण' या संकल्पनेचा अर्थ महिलांना राजकीय सत्ता, अधिकार पदे, समान राजकीय अधिकार, समान राजकीय संधी देणे हा आहे. तसेच निर्णय-निश्चितीचा अधिकार देणे, उत्पादनांच्या साधनांवरती महिलांची मालकी व नियंत्रण प्रस्थापित करणे हा आहे.

**संरचनात्मक फेरबदल**

७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने महिलांना स्थानिक शासन संस्थांमध्ये सुरुवातीला ३० टक्के व त्यानंतर ३३ टक्के व आता ५० टक्के जागा राखीव करण्यात आल्या. १९९० पूर्वी महिला या घटकाचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग मर्यादित होता. त्यांना राज्यघटनेने

अधिकार दिलेले होते. परंतु, प्रत्यक्ष व्यवहारामध्ये त्या या अधिकारांपासून वंचित राहिल्या होत्या. राजकीय क्षेत्रातून त्या बहिष्कृत झाल्या होत्या. लोकशाहीच्या विस्ताराची प्रक्रिया घडून येताना दिसत नव्हती. या घटनादुरुस्तीने महिलांना राजकीय सहभागाची संधी उपलब्ध करून दिली. केवळ राजकीय सहभाग नाही तर राजकीय सत्तापदेदेखील महिलांसाठी राखीव करण्यात आली. सरपंच, सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, नगराध्यक्ष, महापौर ही पदेदेखील महिलांसाठी आरक्षित झाल्याने महिलांना निर्णय-निश्चितीचा अधिकार प्राप्त झाला.

महाराष्ट्रामध्ये २८३०५ एवढ्या ग्रामीण स्थानिक शासन संस्था आहेत. यामध्ये २२९८७५ एवढ्या जागा आहेत. त्यांपैकी ११४९४८ एवढ्या जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. याचा अर्थ ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये ११४९४८ एवढ्या मोठ्या प्रमाणावर महिलांचा राजकीय प्रक्रियेमध्ये सहभाग झालेला आहे; तर ३६६ शहरी स्थानिक शासन संस्था आहेत; यामध्ये ९५१७ एवढ्या जागा आहेत. त्यांपैकी ४९०३ एवढ्या जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. याचा अर्थ शहरी स्थानिक शासन संस्थांमध्ये ४९०३ एवढ्या मोठ्या प्रमाणावर महिलांचा राजकीय प्रक्रियेमध्ये सहभाग झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण व शहरी स्थानिक शासन संस्थांची संख्या २८६७१ एवढी आहे. त्यामध्ये २३९३९२ एवढी सदस्य संख्या आहे. त्यांपैकी ११९८५१ एवढ्या जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर महिलांचा एवढ्या मोठ्या प्रमाणात स्थानिक राजकीय प्रक्रियेतील हा सहभाग आहे. याला 'अघोषित राजकीय क्रांती' असेच म्हणता येईल. यामुळे महिलांचे राजकीय सबलीकरण घडून येताना दिसते.

**तक्ता क्र.१ : राज्यातील स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागा**

| स्थानिक संस्था | संख्या | एकूण जागा | महिलांसाठी राखीव |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | २६ | २६२४ | १३१८ |
| नगरपरिषद | २३० | ५०२३ | २५९५ |
| नगरपंचायत | ११० | १८७० | ९९० |
| जिल्हा परिषद | ३४ | २००६ | १०१३ |
| पंचायत समिती | ३५१ | ४०१२ | २००६ |
| ग्रामपंचायत | २७९२० | २२३८५७ | १११९२९ |
| एकूण | २८६७१ | २३९३९२ | ११९८५१ |

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग व महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१५-१६, पान नं-१५९).



**राजकारणाचे परीघ भेदणारे राजकारण**

महिलांच्या राजकीय समावेशनामुळे राजका
राजकीय प्रक्रियेचे स्वरूप बदलले. महिलांच्या राजकी
प्राधान्यक्रम बदलले. महिलांच्या दैनंदिन जीव
राजकारणाच्या विषयपत्रिकेच्या मध्यभागी आल्या. पा
झाला. पिण्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध झाले प
जनावरांसाठी, शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देण्यासं
भर देण्यात येऊ लागला. दारूबंदी, बालविवाहा
प्राधान्यक्रम बनले (मेघा पानसरे, स्वाती शिंदे, मा
कौटुंबिक हिंसा, मुलांना ज्ञान व कौशल्याधारित शि
लागले. महिलांच्या राजकीय समावेशनामुळे भ्रष्टाचा
प्रक्रिया सुरू झाली. भ्रष्टाचार करणार नाही व करू दे
भूमिका घेतल्याने व्यवस्था परिवर्तन घडून येऊ लागले.
लोकप्रतिनिधी म्हणून प्रवेश करतात. त्या आपल
त्याचबरोबर कोणतेही कार्य यशस्वी करण्यासाठी त्य

ज्या महिलेकडे घराचा उंबरठा ओलांडून सार्व
आत्मविश्वास नव्हता त्या महिला आत्मविश्वासाने
क्षेत्रामध्ये निर्णय-निश्चितीचे राजकारण करीत आहेत
होत्या त्या आरक्षणातून सत्ता प्राप्त झाल्याने ला
जिल्ह्याबाबतचे निर्णय घेऊ लागल्या. महिला सब
वर्चस्वाच्या पारंपरिक संकल्पनांना आव्हान दिले
काम करू शकणार नाहीत, त्या वेळ देऊ शकणार न
काम आहे, राजकारणातील धावपळ महिलांना पेल
व्यवस्थापन करण्याची क्षमता महिलांमध्ये नाही.
अनेक भ्रामक विचारांना महिला सबलीकरण प्रक्रिये
उत्कृष्ट लोकप्रतिनिधी आहेत हे त्यांनी सिद्ध करून दा
गावामध्ये हजर असतात. त्यामुळे कोणतीही समस
उपलब्ध असल्याने त्या समस्येची सोडवणूक सहज
सतत फिरत असतात. ते गावापेक्षा शहरांमध्ये जा
निवडून आलेल्या महिलांनी दिलेली आहे. महिला
म्हणजे पश्चिम बंगालमधील कुलटीकोरी या गाव
ग्रामपंचायतीच्या सर्वच्या सर्व ११ जागांवर महिल

छोट्या शहरातील

### राजकारणाचे परीघ भेदणारे राजकारण

महिलांच्या राजकीय समावेशनामुळे राजकारणाचा रंग पालटला. याचा अर्थ राजकीय प्रक्रियेचे स्वरूप बदलले. महिलांच्या राजकीय समावेशनामुळे राजकारणातील प्राधान्यक्रम बदलले. महिलांच्या दैनंदिन जीवनामध्ये भेडसावणाऱ्या समस्या राजकारणाच्या विषयपत्रिकेच्या मध्यभागी आल्या. पाणी हा घटक विषयपत्रिकेचा केंद्रबिंदू झाला. पिण्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध झाले पाहिजे, कुटुंबासाठी, गावासाठी, जनावरांसाठी, शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील निर्णय-निश्चिती करण्यावर भर देण्यात येऊ लागला. दारूबंदी, बालविवाहावर बंदी, बालकामगारांवर बंदी हे प्राधान्यक्रम बनले (मेघा पानसरे, स्वाती शिंदे, माने). त्याचबरोबर कुटुंब-नियोजन, कौटुंबिक हिंसा, मुलांना ज्ञान व कौशल्याधारित शिक्षण याबाबत निर्णय घेतले जाऊ लागले. महिलांच्या राजकीय समावेशनामुळे भ्रष्टाचारविरहित व्यवस्था निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू झाली. भ्रष्टाचार करणार नाही व करू देणार नाही, अशी महिला प्रतिनिधींनी भूमिका घेतल्याने व्यवस्था परिवर्तन घडून येऊ लागले. महिला राजकारणात प्रवेश करताना लोकप्रतिनिधी म्हणून प्रवेश करतात. त्या आपल्या जातीची अस्मिता विसरतात. त्याचबरोबर कोणतेही कार्य यशस्वी करण्यासाठी त्या पक्षभेददेखील विसरून जातात.

ज्या महिलेकडे घराचा उंबरठा ओलांडून सार्वजनिक जीवनामध्ये सहभाग घेण्याचा आत्मविश्वास नव्हता त्या महिला आत्मविश्वासाने घराची चौकट ओलांडून सार्वजनिक क्षेत्रामध्ये निर्णय-निश्चितीचे राजकारण करीत आहेत. ज्या महिला घरामध्ये कार्य करीत होत्या त्या आरक्षणातून सत्ता प्राप्त झाल्याने लाल दिव्याच्या गाडीत फिरून त्या जिल्ह्याबाबतचे निर्णय घेऊ लागल्या. महिला सबलीकरण प्रक्रियेने पुरुष अधिसत्ता व वर्चस्वाच्या पारंपरिक संकल्पनांना आव्हान दिले आहे (स्वाती शिंदे). महिला उत्कृष्ट काम करू शकणार नाहीत, त्या वेळ देऊ शकणार नाहीत, राजकारण ही चोवीस तासांचे काम आहे, राजकारणातील धावपळ महिलांना पेलवणारी नाही, सार्वजनिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता महिलांमध्ये नाही. यांसारख्या महिलांबाबत असणाऱ्या अनेक भ्रामक विचारांना महिला सबलीकरण प्रक्रियेतून शह मिळाला आहे. महिला या उत्कृष्ट लोकप्रतिनिधी आहेत हे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे. महिला लोकप्रतिनिधी गावामध्ये हजर असतात. त्यामुळे कोणतीही समस्या निर्माण झाली तरी त्या नेहमीच उपलब्ध असल्याने त्या समस्येची सोडवणूक सहजपणे होते. याउलट, पुरुष प्रतिनिधी सतत फिरत असतात. ते गावापेक्षा शहरांमध्ये जास्त वेळ असतात, अशी प्रतिक्रिया निवडून आलेल्या महिलांनी दिलेली आहे. महिला उत्कृष्ट कार्य करतात याचे उदाहरण म्हणजे पश्चिम बंगालमधील कुलटीकोरी या गावामध्ये सीपीआय (एम) या पक्षाने ग्रामपंचायतीच्या सर्वच्या सर्व ११ जागांवर महिला उमेदवार दिले व त्या सर्व निवडून

आल्या. संपूर्ण ग्रामपंचायतीवर महिलांची सत्ता प्रस्थापित झाली.

## राजकीय सत्ताप्राप्तीमधून सबलीकरण

महाराष्ट्रामध्ये डिसेंबर २०१६मध्ये नगरपालिका निवडणुका झाल्या. या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पद हे प्रत्यक्ष जनतेकडून निवडून देण्याची पद्धत स्वीकारली होती. नगराध्यक्ष पदेदेखील महिलांसाठी राखीव होती. सर्वसाधारण, ओबीसी, अनुसूचित जाती व जमातीतील महिला अशा प्रकारे महिलांसाठी असणाऱ्या राखीव पदांसाठी आरक्षण होते. संपूर्ण महाराष्ट्रातून आरक्षित असणाऱ्या तर काही ठिकाणी आरक्षित नसणाऱ्या जागांवरून महिला नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या. एकूण ७७ नगराध्यक्ष निवडून आल्या. पश्चिम महाराष्ट्रातून १८, मराठवाडा विभागातून १७, उत्तर महाराष्ट्रातून १२, विदर्भातून २४ व कोकण विभागातून ६ महिला नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या. एकूण ७७ महिला या थेट जनतेकडून निवडून आलेल्या आहेत. निर्णय-निश्चितीचा सर्वोच्च अधिकार त्यांना प्राप्त झाला आहे. महिलांना राजकीय पदे, सत्ता प्राप्त होणे ही राजकीय सबलीकरणाची प्रक्रिया आहे. स्थानिक राजकारणाच्या रंगभूमीवरील महिला या मुख्य कलाकाराच्या भूमिकेमध्ये येत आहेत.

महाराष्ट्रामध्ये डिसेंबर २०१६मध्ये नगरपालिकांच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकांमधील विभागनिहाय निवडून आलेल्या महिलांची माहिती खालीलप्रमाणे-

**तक्ता क्र.२ : पश्चिम महाराष्ट्रातील महिला नगराध्यक्ष**

| जिल्हा | नगरपालिका | नगराध्यक्ष | जातीगट |
|---|---|---|---|
| कोल्हापूर | कागल | माणिक रमेश माळी | ओबीसी (महिला) |
| | पन्हाळा | रूपाली धडेल | ओबीसी (महिला) |
| | गडहिंग्लज | स्वाती कोरे | सर्वसाधारण |
| | जयसिंगपूर | नीता माने | अनुसूचित जाती (महिला) |
| | इचलकरंजी | अलका स्वामी | अनुसूचित जाती |
| सोलापुर | मंगळवेढा | अरुणा माळी | ओबीसी (महिला) |
| | पंढरपूर | साधना भोसले | सर्वसाधारण |
| | मैंदर्गी | दीप्ती केसूर | सर्वसाधारण (महिला) |
| | अक्कलकोट | शोभा खेडगी | सर्वसाधारण (महिला) |
| | सांगोला | राणी माने | सर्वसाधारण (महिला) |



| | | |
|---|---|---|
| सांगली | आष्टा | स्नेहा माळी |
| | विटा | प्रतिभा पाटील |
| सातारा | सातारा | माधवी कदम |
| | कराड | रोहिणी शिंदे |
| | वाई | प्रतिभा शिंदे |
| | फलटण | नीता नेवसे |
| | पाचगणी | लक्ष्मी कऱ्हाडकर |
| | महाबळेश्वर | स्वप्नाली शिंदे |
| पुणे | बारामती | पौर्णिमा तावरे |
| | तळेगाव | चित्रा जगनाडे |
| | शिरूर | वैशाली वारवारे |
| | जेजुरी | वीणा सोनवणे |
| | दौंड | शीतल कटारिया |
| | इदापूर | अंकिता शहा |
| | लोणावळा | सुरेखा जाधव |

**तक्ता क्र.३ : मराठवाडा विभागातील म**

| जिल्हा | नगरपालिका | नगराध्यक्ष |
|---|---|---|
| लातूर | अहमदपूर | अश्विनी कासनाळे |
| उस्मानाबाद | नळदुर्ग | सुरेखा जगदाळे |
| | कळंब | सुवर्णा मुंडे |
| | भूम | सुप्रिया वारे |
| | तुळजापूर | अर्चना गंगणे |
| | मुरूम | अनिता अंबर |
| | उमरगा | प्रेमलता टोपगे |
| परभणी | पाथरी | मीना भोरे |
| | सोनपेठ | जिजाबाई राठोड |
| | पूर्णा | गंगाबाई ऐकलारे |
| | जिंतूर | सबीया बेगम फारूकी |
| | मानवत | शिवकन्या स्वामी |
| बीड | आंबेजोगाई | रचना मोदी |
| | परळी वैजनाथ | सरोजिनी हालगे |

| | | | |
|---|---|---|---|
| जालना | जालना | संगीता गोरट्याल | सर्वसाधारण महिला |
| | अंबड | संगीता कुचे | अनुसूचित जाती (महिला) |
| | परतूर | विमल जेथलिया | अनुसूचित जाती |
| | भोकरदन | मंजुषा देशमुख | सर्वसाधारण |

तक्ता क्र.४ : उत्तर महाराष्ट्रातील महिला नगराध्यक्ष

| जिल्हा | नगरपालिका | नगराध्यक्ष | जातीगट |
|---|---|---|---|
| नाशिक | मनमाड | पद्मावती धात्रक | सर्वसाधारण महिला |
| | भगूर | अनिता करंजकर | सर्वसाधारण महिला |
| अहमदनगर | राहुरी | प्राजक्ता तनपुरे | ओबीसी |
| | संगमनेर | दुर्गा तांबे | सर्वसाधारण |
| | श्रीरामपूर | अनुराधा अधिक | सर्वसाधारण महिला |
| धुळे | शिरपूर | जयश्रीबेन पटेल | सर्वसाधारण महिला |
| | अमळनेर | पुष्पलता पाटील | सर्वसाधारण महिला |
| | चोपडा | मनीषा चौधरी | सर्वसाधारण महिला |
| | सावदा | अनिता येवले | सर्वसाधारण महिला |
| | फैजपूर | महानंदा ढोले | अनुसूचित जमाती |
| | यावल | सुरेखा कोळी | अनुसूचित जमाती महिला |
| | चाळीसगाव | आशालता चव्हाण | अनुसूचित जाती |

तक्ता क्र.५ : विदर्भ पूर्व विदर्भातील महिला नगराध्यक्ष

| जिल्हा | नगरपालिका | नगराध्यक्ष | जातीगट |
|---|---|---|---|
| वर्धा | पुलगाव | शीतल गाते | सर्वसाधारण महिला |
| | देवळी | सुचिता मंडावी | अनुसूचित जमाती |
| | सिंद्री (रेल्वे) | संगीता शेंडे | अनुसूचित जाती |
| चंद्रपूर | मूल | रत्नमाला भोयर | सर्वसाधारण महिला |

तक्ता क्र.६ : अमरावती विभागातील महिला नगराध्यक्ष

| जिल्हा | नगरपालिका | नगराध्यक्ष | जातीगट |
|---|---|---|---|
| अमरावती | अचलपूर | सुनीता फिस्के | ओबीसी महिला |
| | वरूड | स्वाती आंडे | सर्वसाधारण महिला |
| | मोर्शी | शीला रोडे | सर्वसाधारण महिला |
| | दर्यापूर | नलिनी भारसाकळे | सर्वसाधारण |
| अकोला | मुर्तीजापूर | मोनाली गावंडे | सर्वसाधारण महिला |
| | पातूर | प्रभा कोथळकर | अनुसूचित जाती |
| | तेल्हारा | जयश्री पुंडकर | सर्वसाधारण महिला |
| बुलढाणा | चिखली | प्रिया बोंद्रे | ओबीसी महिला |
| | देवळगावराजा | सुनीता शिंदे | सर्वसाधारण महिला |
| | खामगाव | अनिता डवरी | अनुसूचित जाती |
| | शेगाव | शकुंतला बुच | अनुसूचित जाती |
| | जळगाव जामोद | सीमा डोंबे | ओबीसी महिला |
| | नांदूरा | रजनी जवरे | अनुसूचित जाती महिला |
| वाशिम | मंगळूरपीर | गझाल यास्मिन खान | सर्वसाधारण महिला |
| यवतमाळ | यवतमाळ | कांचन चौधरी | सर्वसाधारण महिला |
| | पुसद | अनिता नाईक | ओबीसी महिला |
| | उमरखेड | नामदेवी ससाने | सर्वसाधारण महिला |
| | दिग्रज | सदफजहाँ जावेद | सर्वसाधारण महिला |
| | आर्णी | अर्चना मंगाम | अनुसूचित जमाती |
| | घाटंजी | नैना ठाकूर | सर्वसाधारण महिला |

तक्ता क्र.७ : कोकण विभागातील महिला नगराध्यक्ष

| जिल्हा | नगरपालिका | नगराध्यक्ष | जातीगट |
|---|---|---|---|
| रत्नागिरी | चिपळूण | सुरेखा खेराडे | सर्वसाधारण |
| रायगड | उरण | सायली म्हात्रे | ओबीसी |
| | खोपोली | सुमन अवसरमल | अनुसूचित जाती |
| | मुरूड | स्नेहा पाटील | सर्वसाधारण महिला |
| | महाड | स्नेहल जगताप | सर्वसाधारण महिला |
| | माथेरान | प्रेरणा सावंत | सर्वसाधारण महिला |

छोट्या शहरात पितृसत्ताक पक्षाकडून महिला राजकारणात सहभागी झाल्या आहेत. परंतु, सामूहिक भागीदारीमुळे क्षमतांचा विकास होत आहे. स्थानिक पातळीवर महिलांच्या राजकीय सबलीकरणाची प्रक्रिया घडत आहे. स्वतःच्या जीवनामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचे माध्यम किंवा साधन म्हणून राजकारणाकडे पाहण्याची दृष्टी महिलांमध्ये विकसित होत आहे. यादृष्टीने स्थानिक राजकारणातील व निर्णयप्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढत आहे. या प्रक्रियेमुळे लोकशाहीचा विस्तार होत आहे. महिलांनी राजकारणाचे प्राधान्यक्रम बदलविले. दैनंदिन गरजा यांना राजकारणाच्या मध्यभागी आणले. सामान्यातील सामान्य माणसाच्या हितप्राप्तीसाठी राजकीय सत्ता वापरली जाऊ लागली. राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन महिला स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करीत आहेत. स्थानिक राजकारणातील संधी व अनुभव यामधून महिलांचे राजकीय शिक्षण होत आहे. महिलांमधील राजकीय कौशल्य विकसित करण्यासाठी स्वयंसेवी संस्था प्रशिक्षण देत आहेत. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये महिला वाटाघाटीचे तंत्र व सौदेबाजीचे कसब आत्मसात करीत आहेत. संस्थात्मक प्रथा, परंपरा बदलण्यासाठी त्या संघर्ष करीत आहेत. राजकारण हे समस्यांवरील उपायांचे क्षेत्र आहे, हे आपल्या निर्णय व कृतीमधून त्या सिद्ध करीत आहेत. स्थानिक पातळीवर हा सकारात्मक बदल घडून आलेला आहे. परंतु, राज्य व राष्ट्रीय पातळीवर मात्र महिलांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व नाही. तसेच राजकीय सत्तादेखील मिळत नाही. महिलांच्या राजकीय सबलीकरणाची प्रक्रिया ही केवळ स्थानिक पातळीवर राबविली जात आहे. राज्य व राष्ट्रीय पातळीवर मात्र महिलांचे राजकीय समावेशन घडून येताना दिसत नाही. महाराष्ट्र विधानसभेच्या झालेल्या १२ सार्वत्रिक निवडणुकांमधून ३३९६ सदस्य निवडून आले. त्यांपैकी ३२५९ (९५.९७ टक्के) पुरुष आमदार व केवळ १३७ (४.०३ टक्के) महिला आमदार आहेत. महाराष्ट्र राज्यपातळीवर केवळ ४.०३ टक्के महिलांचे प्रतिनिधित्व आहे. ही आकडेवारी असे दर्शविते की, राज्यपातळीवरील राजकारणात महिला या परिघावर आहेत. महिला घटकाचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी असल्याने निर्णय-निश्चितीच्या राजकारणामध्ये महिलांचे समावेशन घडून येताना दिसत नाही. यासाठी राज्य व राष्ट्रीय पातळीवर सकारात्मक कृती धोरण अमलात आणण्याची गरज आहे. केवळ स्थानिक पातळीवरच महिलांच्या क्षमता व कौशल्याचा विकास होत आहे. स्थानिक पातळीवर आत्मसात केलेल्या क्षमता व कौशल्यांचा प्रभावीपणे वापर करण्याची संधी राज्य व राष्ट्रीय पातळीवर मात्र नाकारली जात आहे. जोपर्यंत राज्य व राष्ट्रीय पातळीवर महिलांना

समान संधी प्राप्त होत नाही तोपर्यंत महिलांच्या राजकीय सबलीकरणाची प्रक्रिया अपूर्ण आहे असे म्हणता येते. स्थानिक पातळीवरील राजकारणामध्ये महिलांना राजकीय क्षेत्रात समान संधी मिळाल्याने महिलांचे स्थानिक पातळीवर महिलांचे मर्यादित राजकीय सबलीकरण घडून येत आहे, असे म्हणता येईल.